सन २०१८-१९ करीता राज्य योजनेंतर्गत वनविकास करापासून मिळणाऱ्या जमा रकमामधून वित्त व्यवस्थापन करण्यात आलेल्या योजनेतून नविन/ चालू बाब प्रस्तावातील कामांकरिता निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३२८/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २९ मार्च, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.४१/२०१८-१९/५१४, दि. २७.०६.२०१८.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. यांचे पत्र क्र. कक्ष १/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.४१/२०१८-१९/५२६, दि. २९.०६.२०१८
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष १/ पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.४१/२०१८-१९/९८३, दि. ०३.०९.२०१८.
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष १/ पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.४१/१००३-२०१८-१९, दि. ०६.०९.२०१८
७. महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३२८/फ-९, दिनांक १४.०९.२०१८
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५.०१. २०१९
९. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/२०१९/कोषा प्रशा-५, दिनांक ३१.०१.२०१९
१०. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३,दिनांक ०८.०३. २०१९
११. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष- १/ पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.४१/२४९९/२०१८-१९, दिनांक २८.०३.२०१९

प्रस्तावना :-

राज्य योजनेअंतर्गत सन २०१८-१९ करीता वनविकास करापासून मिळणाऱ्या जमा रकमामधून वित्त व्यवस्थापन करण्यात आलेल्या योजनाबाबत (४४०६ ०१७१) या योजनेकरीता रू.४००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे. तसेच आठमाही सुधारीत अंदाजानुसार रु.४००.०० लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१० परिपत्रकान्वये सन २०१८-१९ करिता निधी वितरण /पुनर्विनियोजन प्रस्तावाच्या अनुषंगाने निधीचे वितरण करण्यात यावे, असे आदेश आहेत. सदर निधी वितरित करतांना दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिशिष्टातील अटीची पूर्तता व दिनांक २५.०१.२०१९ मधील सूचनांचे पालन करण्याचे कळविले आहे. सदर योजनेंतर्गत संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयान्वये रु. २८०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. आता सदर योजने अंतर्गत रु.१२०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यासाठी शिल्लक आहे.

सदर योजनेअंतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने गडचिरोली, धुळे, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प, नागपूर, चंद्रपूर, ठाणे या वनवृत्तातील अधिकारी कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर बाबी करीता प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.६ नुसार पाठविलेल्या रु.२८७.३४ लक्षच्या प्रस्तावापैकी रु.९५.४४ लक्ष रक्कमेला संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात

आली आहे. प्रस्तावाच्या उर्वरीत रु.१९१.९० लक्षच्या अनुषंगाने या योजनेत शिल्लक असलेल्या रु.१२०.०० लक्ष रक्कमेला मंजूरी प्रदान करुन BDS वर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.११ अन्वये विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय:-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.६ व ११ वरील पत्रान्वये शासनास सादर केलेले प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१,८,९ व १० येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, राज्य योजनेअंतर्गत वनविकास करापासून मिळणाऱ्या जमा रकमामधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६-०१७१) या योजनेमधून खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या कामांकरीता रु.१२०.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.:-

अ.क्र.	**वनवृत्त**	**प्रस्तावित रक्कम (रु.लाखात)**	**शासन निर्णय दि.१४.०९.२०१८ नुसार मंजूर केलेली रक्कम (रु.लाखात)**	**सन २०१८-१९ करीता या शासन निर्णयानुसार मंजूर रक्कम (रु.लाखात)**
१	गडचिरोली	७०.७४	२१.२२	३०.९६
२	धुळे	४३.९७	१३.१९	१९.२५
३	नागपूर	७५.४९	२५.८३	३१.०५
४	चंद्रपूर	२७.५९	१०.५०	१०.६९
५	ठाणे	६८.३६	२३.५१	२८.०५
	एकूण :-	**४७१.९०**	**९५.४४**	**१२०.००**

उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याच्या दृष्टीने (४४०६ ०१७१) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या खालील अटी व शर्तीचे पालन करणे संबंधितावर बंधनकारक राहील.

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना घ्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

२. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

३. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.

४. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग

होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

५. उपरोक्त कामे मंजूर अनुदानातून उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा.), गडचिरोली/ धुळे/चंद्रपूर/ठाणे यांची राहील.

७. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

८. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर / नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कुठलीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१०. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८,२५.०१.२०१९,३१.०१.२०१९ व ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

११. शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१३. वितरित केलेला निधी मंडळे / महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधी मध्ये काढून ठेवता येणार नाही.

उपरोक्त खर्च रिट याचिका क्रमांक १२७७/२००० मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाचा नागपूर खंडपीठाने दिलेल्या आदेशानुसार वनसंरक्षणासाठी सन २०१८-१९ करीता प्रधान शिर्ष- ४४०६, वनिकरण व वन्यजीवन, १०२ सामाजिक व क्षेत्र वनिकरण, (०८)(०१) वनविकास करापासून मिळणाऱ्या जमा रकमामधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६ ०१७१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१८०५४६८३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.29 18:10:18 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई
४. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली/चंद्रपूर/धुळे/नागपूर/ठाणे
५. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा अंधारी, व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर
६. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
७. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-३), मंत्रालय, मुंबई-३२.
८. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
९. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१०. कार्यासन अधिकारी, फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)